मंगळवार दि.४ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–अॅड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७० किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# पाठीवरती हात ठेवून, तू फक्त लढ..म्हणणारा माणूस! : अॅड.डॉ.विजयकुमार कस्तुरे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

अॅड. डॉ. विजयकुमार कस्तुरे, चिखली काही मोजकी माणसं सोडली तर जिल्हाभरच नव्हे तर महाराष्ट्रासह विविध राज्यात सर्वत्र परिचित असलेलं नांव. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर नेपाळ काठमांडू मध्ये देखील आपल्या वाणीतून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या कवितेला घेऊन अंतराष्ट्रीय नेपाळ कवी संमेलनातील संमेलाध्यक्षपदापर्यंत पोचलेल्या व्यक्ती बद्दल आज लिहिण्याचा हा प्रयत्न...

जगात लाखो लोक कसे आहेत की ते आपल्याजवळ असलेल्या मोबाईल बद्दल तक्रारी करत असतात किंवा जगातील लोकांबद्दल मोबाईल मुळे नेहमी विपरीत परिणाम होत असल्याचे ते बोलत असतात मात्र या उलट देखील काही गोष्टी असतात त्याकडे आपण दुर्लक्ष करतो. प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात त्यातील चांगली बाजू आपण अंगिकारली पाहिजे इतकेच. मागील काही वर्षापासून आजतागायत मोबाईलच्या वापरामुळे माझ्या आयुष्यात तरी काही नुकसान झाल्याचे मला अजिबात वाटत नाही. मात्र या उलट याच मोबाईल मुळे अनेक मोठ्या लोकांसोबत संपर्क झाला आणि नामांकित लोक आपल्या सोबत जोडल्या गेले ही देखील महत्त्वाची बाब..

ऑक्टोबर, २०२२ दुपारच्या वेळेला अचानक संदर्भात मला एक फोन आला. चिखली वरून ड. विजयकुमार कस्तुरे बोलतोय असे समोरची व्यक्ती म्हणाली.त्यावेळेस हे नांव मला अपरिचित होतं. आणि साहजिकच आहे अशा वेळेला परिचय नसला तरीही आपण समोरील व्यक्तीला आपल्याबद्दल आपुलकी वाटेल अशा भाषेत आपल्याला बोलावे लागते. मी त्यावेळी शेतात असल्याने मी तुम्हाला संध्याकाळी फोन करतो असे म्हणून मी फोन ठेवला. मात्र संध्याकाळी मी फोन करायच्या अगोदर मला फोन आला आणि आमच्या काही बातम्या प्रकाशित होतील का ? असे त्यांनी विचारले. तेव्हापासून बातम्या प्रकाशित करण्याच्या अनुषंगाने फोनवर कस्तुरे साहेब व आमचा नियमित संवाद होऊ लागला. अशातच एका कामानिमित्त फोन केला असता बुलढाणा येथे येऊन भेटा असे सांगितल्याने माझा मित्र ऋषिकेश जायभाये व मी बुलढाणा येथे त्यांची भेट घेण्यासाठी गेलो असता सर्वप्रथम त्यांना पाहून आश्चर्य चकित झालो. कारण समोर आम्हालाच नव्हे तर कुणालाही लाजविणारी एक हसरी व तरूण वाटणारी व्यक्ती उभी दिसली. ही आमची पहिलीच भेट. मात्र त्यानंतर कदाचित आम्हाला भेटतच राहायचे असेल असे बहुतेक नियतीनेच ठरवल्यासारखे झाले. भेटल्यानंतर बहुजन साहित्य संघाच्या व विविध साहित्य आणि कवी संमेलनामधील त्यांच्या सहभाग व योगदानाच्या बातम्या सातत्याने प्रकाशित केल्यामुळे त्यांनी संघाच्या वतीने सन्मानपत्र देऊन आमचा आदरपूर्वक सन्मान केला. व त्यानंतर जेव्हा केव्हा व कसलेही काम पडल्यास, तुमचे काम होऊन जाईल असे ठामपणे सांगून ते करण्याच्या त्यांच्या आत्मियतेने आम्हाला त्यांची ओढ लागली ती कायमचीच.

जगात प्रत्येक व्यक्ती जन्माला येतांना सोबत काहीही घेऊन येत नसतो. मात्र जगात आल्यानंतर इतरांसाठी आपण काही तरी केलं पाहिजे, या उद्देशाने काही लोक जीवन जगत असतात. त्यापैकीच एक असे ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे सर्वांना आपल्या आत्यंतिक सकारात्मक जीवन शैलीने वेड लावणारे व्यक्तिमत्व म्हणून मला त्यांच्या कडे पहावे लागले. सहजच प्रत्येक व्यक्तीला आपलेसे करणे आणि जो व्यक्ती आपल्याला मिळाला तो कायम स्वरुपी आपलाच. ही साहेबांची वृत्ती..

०१ ऑगस्ट, २०२३ रोजी दैनिक लोकनेताच्या वृत्तपत्राला सुरुवात झाली. वेबपोर्टल सुरू असताना साहेबांच्या बातम्यांमुळे विचारांची देवाण घेवाण ही नेहमी होत असल्याने काही तरी करणारा व्यक्ती आपल्या सोबत जोडल्या गेल्या असल्याने नियमितपणे प्रत्येक गोष्टींना साहेबांकडून प्रतिसाद लाभत गेला. जशी जशी ओळख वाढत गेली तसतशी साहेबांच्या विचारांची ओढ आम्हाला लागत गेली. ९० वर्षाचा तरुण, चाळिशीतल्या व्यक्तीला लाजवेल अशा पद्धतीने काम करत असेल तर आपण अजून तरुण आहोत हा विचार नेहमी आम्हाला प्रेरणा देत गेला आणि न कळत केव्हा ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे साहेब यांच्या विचारांनी प्रभावित होऊन काम करण्याची ऊर्जा आम्हाला मिळाली कळले नाही.

अन्यायाला वाचा फोडणारे एक नव्हे तर शेकडो जिवंत प्रसंग साहेबांकडून आणि साहेबांच्या सान्निध्यात ऐकायला व शिकायलाही मिळाले .एक वकिल कसा असावा किंवा वकील असताना देखील सामाजिक भावनेतून आपण कसे काम करू शकतो. हे साहेबांकडून शिकावं. पेपर चालवत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अशा वेळी प्रसंगी आक्रमण भूमिका देखील आपल्याला घ्यावी लागते. परंतु कुठे आणि केव्हा तीव्र भूमिका घ्यायची आणि कुठे नरमाईने



**सात दशकाच्या समर्पित सामाजिक सेवेसाठी साउथ वेस्टर्न अमेरीकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट अर्थात डॉक्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी प्राप्त तसेच विविध राज्यातील आणि अंतराष्ट्रीय नेपाळ कवी संमेलनातील पुरस्कार प्राप्त, राष्ट्रीय कार्याध्यक्ष, केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली, अध्यक्ष, बहुजन साहीत्य संघ चिखली तथा महाराष्ट्रातील सर्वात ज्येष्ठ वकीलांपैकी एक, सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त कवी, लेखक, गीतकार, गायक विविध वाद्य वादक, हरहुन्नरी कलावंत, अभिनेता, दिग्दर्शक, कथाकार, लघु चित्रपट कथा लेखक, क्राईम रिपोर्टर, तसेच दैनिक लोकनेता चे मानद सल्लागार अशा अनेक भूमिका निभावत गेल्या सात दशके आपल्या सामाजिक जाणिवेतून सातत्याने प्रबोधनाचे काम करत आलेल्या एका अफलातून व्यक्तिमत्वाबद्दल दोन शब्द लिहिण्याचा योग आला ही माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट...**

प्रसंग हाताळायचा याचे धडे आदरणीय साहेबांकडून आम्हाला मिळाले .

मागील ७ दशकांमध्ये अनेक भूमिका त्यांनी निभावल्या. वकिली व्यवसाय करत इतरही क्षेत्रात अग्रेसर असल्याने देशाच्या विविध भागातील अनेक नामवंत लोकांजवळ साहेबांनी जवळीक साधलेली दिसली. महाराष्ट्र राज्याचे माझी मुख्यमंत्री शरद पवार यांच्याही सोबत १०-१२ वर्षे जिल्ह्याचे संघटक राहिल्याचेही कळले. तसेच जिल्हाधिकारी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी अशा अनेक परीक्षा त्यांनी पास करून तरीही नोकरीची बांधिलकी न पत्करता आपला वकिली व्यवसाय करतांनाच विविधांगी सामाजिक क्षेत्रातील कार्य सुध्दा त्यांनी आपुलकीने केले. आणि एवढेच नाही तर गोरगरीब, तळागाळातील पिडीत, त्रस्त, गरजू तथा मजूर, हमाल, मापारी, कामगार,भूमिहीन, सुशिक्षित बेकार, अन्यायग्रस्त, विधवा, विधूर, परित्यक्ता, निराधार, रूग्ण, कलावंत, तमासगीर, आर्थिक सामाजिक तथा शैक्षणिक मागास, आदिवासी,भटक्या जमाती, पूर पिडीत, भूकंपग्रस्त, अशा कुठल्याही गरजवंतांच्या मदत व सहकार्यासाठी धावून जाण्यात त्यांनी कधीही कसूर केली नाही. वयाच्या नव्वदीच्या उंबरठ्यावर आले तरीही आज सुध्दा ते महाराष्ट्रभर विविध जिल्हा व इतर न्यायालयात आपली सेवा नागरिकांना देताना दिसतात आणि या सोबतच साहित्यिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान असून साहित्य विश्वात त्यांचे नाव मानाने घेतल्या जाते. लोकशाहीर वामन दादा कर्डक यांच्या समवेत सुध्दा गायन प्रबोधनाच्या विधायक कार्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. ही सारी कामे करताना सर्व समावेशक व प्रत्येक क्षेत्रात अनुभवी व्यक्ती म्हणून त्यांच्या कडे सर्व जण बघतात .

तसेच काव्य प्रांतात, त्या तरूच्या सावलीला चल सखे बोलू जरा, ही त्यांची काव्य रचना महाराष्ट्रालाच नव्हे तर विविध राज्यातील व अंतर्राष्ट्रीय स्तरावर सुध्दा कवीरसिकांना कायम वेड लावते आहे. अशा अनेक रचना त्यांनी केल्या असून उद्रेक या नांवाने अनेक अनियतकालिके, कविता संग्रह, आम्ही कोण ? हे दिर्घ काव्य, कथा, पथनाट्य इत्यादी त्यांचे लिखाण प्रकाशित झालेले असून त्या मधून त्यांनी वेळोवेळी सातत्याने प्रबोधन केले आहे व करीत आहेत.

हे शब्द आज माझे, झाले मुके तरीही
ते बोलतील, भाषा हमखास वादळाची...

या त्यांच्या चार ओळींच्या कवितेने प्रत्येकाच्या हृदयावर गोंदल्या गेलेल्या असून दैनिक लोकनेता च्या पायाबांधणीत त्यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन वेळोवेळी आम्हाला लाभले आहे. इथून पुढेही साहेबांचे मार्गदर्शन लाभत राहणार असून साहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन अन्यायाला वाचा फोडण्याचे काम दैनिक लोकनेता करत राहील यात शंका नाही. शेवटी कुसुमाग्रज यांच्या २ ओळी आठवतात

की मोडून पडला संसार तरि मोडला नाहि कणा
पाठीवरती हात ठेउन नुसते लढ म्हणा.

साहेबांच्या विचारांची माणसं आमच्या आयुष्यात आली आणि आम्हाला लिहतं बोलतं होता आलं. आज अनेक मित्र आयुष्यात आहेत पण त्यातील एक मित्र असा की आपल्यासाठी शेकडो कि. मी. प्रवास करत येईल आणि अभिमानाने पाठीवर थाप देऊन तू लढ मी तुझ्या पाठीशी आहे ! असं म्हणेल ते केवळ कस्तुरे वकीलच ! आज साहेबांचा ९० वा वाढदिवस या जन्मदिनी साहेबांना माझा परिवाराकडून व दैनिक लोकनेता परिवाराकडून मनस्वी शुभेच्छा... तुमचे आशीर्वाद मार्गदर्शन नेहमी आम्हाला लाभत राहो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.







# राष्ट्रीयीकृत बँकांचा शेतकऱ्यांना दणका! व्याजसवलत प्रस्तावच न पाठवल्याने नुकसान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

राज्यातील शेतकऱ्यांनी अल्पमुदतीच्या पीककर्जाची परतफेड केल्यानंतर देण्यात येणारे तीन टक्के व्याज अनुदान राष्ट्रीयीकृत बँकांच्या हेकेखोरपणामुळे शेतकऱ्यांना मिळत नसल्याचे समोर आले आहे. राज्यातील ३५ हून अधिक राष्ट्रीयीकृत बँकांनी सहकार विभागाकडे प्रस्तावच न पाठविल्याने शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देता येत नाही, अशी तक्रार सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत केली.या तक्रारीची आरबीआयच्या अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेतली असून असे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे आदेश दिले आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने कर्जपुरवठा करण्यासाठी 'पंजाबराव देशमुख व्याज सवलत' योजनेतून तीन टक्के व्याज परतावा दिला जातो. २०१२ पासून एक लाखापर्यंतच्या कर्जावर वार्षिक तीन टक्के व त्यापुढील तीन लाखांपर्यंतच्या कर्जावर एक टक्के व्याज सवलत देण्यात येते.२०२१ पासून तीन लाख मर्यादेपर्यंतच्या अल्पमुदत पीककर्ज घेऊन त्याची मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन टक्के व्याज सवलतीचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे केंद्र सरकारचे तीन टक्के आणि राज्य सरकारने तीन टक्के असा सहा टक्के व्याजपरतावा बँकांना मिळत असल्याने केवळ मुद्दल भरून घेण्याचे आदेश आहेत. मात्र, राज्यातील राष्ट्रीयीकृत बँकांनी या आदेशाला केराची टोपली दाखविली आहे.या बँका शेतकऱ्यांना कर्ज देताना हात आखडता घेतात,




त्यामुळे खरीप हंगामाच्या आढावा बैठकीत दर वर्षी मुख्यमंत्री आणि मंत्री या बँकाच्या अधिकाऱ्यांना सूचना देऊनही त्याला फारसे महत्त्व देत नाहीत. ज्या बँका कर्जपुरवठा करत नाहीत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेशही दिले होते. त्याचाही परिणाम झालेला नाही.त्यात ज्या शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला आहे त्यांना व्याजसवलत मिळावी असेही या बँकांना वाटत नाही. वास्तविक या बँका शेतकऱ्यांकडून सात टक्के व्याजदराने कर्जवसुली करत आहेत. त्यामुळे प्रस्ताव पाठविण्याची तसदी या बँका घेत नाहीत. परिणामी शेतकऱ्यांना व्याजमाफीपासून वंचित राहावे लागत आहे.याची माहिती सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत दिली. या बँका गेल्या अनेक वर्षांपासून व्याजसवलतीचे प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवतच नाहीत त्यामुळे शेतकरी वंचित राहत[illegible]त, असा मुद्दा उपस्थित केला. या तक्रारीची आरबीआयचे अधिकारी आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या सदस्यांनी गंभीर दखल घेतली. ज्या बँकांनी असे प्रस्ताव पाठविले नाहीत त्यांनी तातडीने हे प्रस्ताव पाठवावेत असे आदेश देण्यात आले आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, विदर्भ ग्रामीण बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक राज्यातील बहुतांश जिल्हा बँका वेळेत राज्य सरकारकडे प्रस्ताव दाखल करतात. अनेकदा निधीअभावी व्याजसवलतीचे पैसे देणे सरकारला जमत नाही. मात्र, हे पैसे मिळणार याची खात्री असल्याने बँका मुद्दल भरून घेतात. मात्र, राष्ट्रीयीकृत बँका प्रस्ताव पाठवत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

# मुंबई आरक्षण उपवर्गीकरणासाठी महामोर्चात सामील व्हा सतीश कावडे यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

अनु. जाती आरक्षण उपवर्गीकरण विधेयक महाराष्ट्र सरकारने मंजूर करावे, या मागणीसाठी दि.५ मार्च रोजी आझाद मैदान मुंबई येथे मांगवीर महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सकल मातंग व तत्सम वंचित जात समुहाच्या समाज बांधवांनी या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.असे आवाहन अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष सतीश कावडे यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकाल व निर्देशानुसार राज्यातील अनु.जातीतील मागास अशा मातंग व तत्सम वंचित जात समुहाच्या मागणीनुसार अनुसूचित जाती आरक्षणाची पद्धत निश्चित करण्यासाठी राज्य सरकारने न्यायमूर्ती बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीचा अहवाल घेऊन व महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या सर्व अभ्यास समितीचा शासनाकडे असलेल्या अहवाला आधारे अनु.जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण महाराष्ट्र राज्याने विधेयक मंजूर करावे.हरियाणा, पंजाब,कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश आदी राज्यांनी अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण विधेयक पारित करत आरक्षणाचे उपवर्गीकरण मंजूर केले आहे.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकाल व निर्देशानुसार महाराष्ट्रातही अनु.जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण विधेयक मंजूर करावे आणि सामाजिक न्यायाची प्रक्रिया सुरू करावी.अनु.जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण मंजुरीचा तातडीने कायदा पारित करावा, या मागणीसाठी अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलन,दलित महासंघ, लालसेना आणि समविचारी संघटनेच्या वतीने मुंबई येथे मांगवीर महामोर्चाचे आयोजन दि.५ मार्च रोजी केले आहे. त्यात समाजातील बुद्धीवादी, सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे, समाजबांधवांनी संजय ताकतोडे यांचे बलिदान विचारात घेऊन सर्वांनी महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष सतीश कावडे यांनी केले आहे.नांदेड जिल्हा सकल मातंग समाजाच्या वतीने हजारोंच्या संख्येने मांगवीर मोर्चात आझाद मैदान मुंबई येथे उपस्थित राहावे.असे आवाहन सतीश कावडे, रामराव सूर्यवंशी,उत्तम बाबळे,इंजि. भाऊसाहेब घोडे, किशनदादा गायकवाड, शिवाजीराव नुरुंदे,एन.डी. रोडे, आकाश सोनटक्के, मालोजी वाघमारे,प्रा.सचिन दाढेल, नागेशभाऊ तादलापूरकर, सुभाष अल्लापूरकर,पत्रकार के.मूर्ती,रामभाऊ देवकांबळे, विश्वांभर बसवंते,डॉ.गंगाधर तोगरे,मच्छिंद्र गवाले,संजय गवलवाड,पंडित देवकांबळे, मनोहर वाघमारे,बालाजी गऊळकर,निलेश मोरे, यादवराव वाघमारे, पी.बी. वाघमारे,यू.एम. भिसे,हनुमंत कंधारे,किरण दाढेल,गणेश गायकवाड,आनंद वंजारे आदींनी केले आहे.

# वाचनाने जनाशी आणि मनाशी संवाद साधता येतो-प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोनपेठ । प्रतिनिधी**

विटा ता.सोनपेठ: वाचनाने माणूस आत्मशोध घेऊ शकतो. वाचनाने जनाशी आणि मनाशी संवाद साधून माणूस प्रगल्भ होतो. त्यामुळे आजच्या तरुणाने वाचन कौशल्य जपावे असे उद्गार प्रा.डॉ.जायभाये यांनी आज राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या आजच्या बौद्धिक सत्रात काढले.

कै.रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरात आज दिनांक ०३/०३/२०२५ रोजी मौजे विटा बु.ता.पाथरी येथे आज दुपारच्या बौद्धिक सत्रात 'वाचन कौशल्य' या विषयावर प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.बालासाहेब काळे हे होते. यावेळी काळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मन, मस्तिष्क कणखर बनविण्याचे काम वाचनातून होते असे अध्यक्षीय




समारोप प्रसंगी म्हटले. या कार्यक्रमास रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बापुराव आंधळे, प्रा.डॉ.अंगद फाजगे, प्रा.डॉ.मुक्ता सोमवंशी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सदरिल शिबिरात युथ फॉर माय भारत, युथ फॉर डिजिटल लिटरसी या थिमवर आधारित आजच्या बौद्धिक सत्राचे आयोजन सोशल मीडिया ग्रुपने केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अभिजित आरबाड याने तर आभार प्रदर्शन कु.श्वेता खरात हिने केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सोनकांबळे यांचा आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहों । विशाल घंटे**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे विकासाभिमुख लोकप्रिय आमदार तथा नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून काल दि.२ मार्च रविवार रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नांदेड येथील साई सुभाष निवासस्थानी राष्ट्रवादी अजित दादा पवार गटात जाहीर प्रवेश केला, यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अशोक सोनकांबळे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शाल श्रीफळ पुष्पहार घालून स्वागत करून पक्ष प्रवेश केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अशोक सोनकांबळे यांनी माजी आमदार शामसुंदर शिंदे यांचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून पाच वर्ष काम केलेले असून अशोक सोनकांबळे पत्रकार आहेत,दरम्यानच्या काळात त्यांनी केलेल्या कार्याबद्दल, ते मतदारसंघात सर्व परिचित असून, त्यांची प्रामाणिक, शांत, सयंमी,मितभाषी



व्यक्तीमत्व म्हणून मिडिया परिवारात ओळख आहे.त्यांनी लोहा तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे तालुका सदस्य व सिद्धार्थ नगर मित्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक, राजकीय उपक्रमांत समजापयोगी भावनेने योगदान दिले आहे. सिद्धार्थ नगर येथे,सर्व जाती धर्माच्या सण उत्सवात हिरहिरीने सहभागी होऊन,महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी,दुर्गा देवी,गणपती उत्सव, मोहरम,रमजान आदी उत्सवात सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यात यशस्वीपणे भुमिका पार पाडली आहे. अशोक सोनकांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटात प्रवेश केल्याने आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी जिल्हा परिषद सदस्य युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांनी अशोक सोनकांबळे यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी आंबेडकरी चळवळीचे युवा नेते रविदादा गायकवाड, लोहा नगर परिषदेचे मा. नगरसेवक भास्कर पाटील पवार,शिक्षण जिल्हा पतपेढीचे चेअरमन अशोक पाटील मारतळेकर, उपाध्यक्ष सुहास मुळे,सचिन पवार,सह मित्रपरिवार उपस्थित होता.त्यांच्या निवडीबद्दल आप्तवासिय ,मित्रपरिवार, हितचिंतकांनी सोशलमिडियांच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव सुरू केला असून,भावी कार्यासाठी शुभेच्छा देतांना दिसून येत आहेत .

# आईच्या अंत्यविधीनंतर तासाभरातच मुलीने दिला दहावीचा पेपर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

पहाटे आईचे निधन झाले.सकाळी ९.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले आणि डोळ्यातले आभाळा एव्हडे दुखःउरात घेवून मुलगी दहावीच्या पेपरसाठी परिक्षा केंद्रावर पोहचली.ही घटना धामनगाव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये शनिवार दि.१ मार्च रोजी घडली.

धामणगाव येथे दि.१ मार्च रोजी पहाटे साधना राजु मुळे यांचे निधन झाले. त्यांची मुलगी नम्रता राजु मुळे ही दहावीचे पेपर देत आहे.शनिवारी पहाटे निधन झाले आणि मुळे कुटूंबावर शोककळा पसरली.सकाळी ९.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.यानंतर तासाभरातच इंदिरा माध्यमिक विद्यालय,धामणगाव येथे सुरू असलेल्या दहावीच्या इंग्रजीविषयाच्या पेपरला नम्रता पोहचली. आईच्या अचानक निधनाने तिच्या डोळ्यात अश्रू,मनात हळवेपणाचेकाहूर आणि हातात परीक्षेचे



पेपर. यापेक्षा मोठे दुःख कोणते असू शकते?,एकीकडे परीक्षेचे दडपण,तर दुसरीकडे मातृछत्र हरवल्याचा आभाळासारखा मोठा आघात.या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.दरम्यान,शनिवारी सकाळी मयत साधना मुळे यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथे दाखल करायचे होते.मात्र,काळाने त्यासाठी वेळ दिला नाही.कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून,पती राजू मुळे,मुलगा यश मुळे (बारावी परीक्षा देत आहे),मुलगी नम्रता मुळे असा परिवार या कठीण प्रसंगातून जात आहे.नम्रता मुळे या दहावीची परीक्षा देणाऱ्या मुलीच्या आईचे निधन झाल्याने या कठीण व दुःखद परिस्थितीत शिक्षण विभागाकडूनही मानसिक आधार देण्यात आला. आष्टीचे गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव आणि केंद्र संचालक राजू गर्जे यांनी स्वतःपरीक्षा केंद्रावर भेट देऊन नम्रता मुळे या विद्यार्थीनीचे सांत्वन केले व मानसिक आधार दिला. त्यांच्या मानसिक आधारामुळे ती परीक्षा देण्यास तयार झाली.या मुलीची शिक्षणाप्रती असलेली निष्ठा आणि मानसिक धैर्य सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# भिगवण पोलीस स्टेशन चे महेश उगले आणि संतोष मखरे यांची सिंघम कामगिरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भिगवण पोलिसांनी दमदार कामगिरी करत उस वाहतूक करणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्याचा बारामती अग्रो कारखाना शेटफळगढे परिसरातून चोरी झालेला ट्रॅक्टर हस्तगत करीत चोराच्याही मुसक्या आवळल्या.

अनेक ठिकाणाचे सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या मदतीने केलेल्या कामगिरी मुळे पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार यातील चोरटा सोमनाथ भारत शिंदे वय,२३ रा.शिंदेवस्ती बावडा ता.इंदापूर याला अटक करण्यात आले आहे.याबाबत दिलेल्या



माहितीनुसार शेतकरी ऊस वाहतूकदार अक्षय अनिल राऊत रा.केतुर ता.करमाळा यांनी बारामती शेटफळ अग्रो कारखाना येथून आपला ट्रॅक्टर नंबर एम.एच.४५ ए क्यू ३२०७ अज्ञात चोरट्यांनी चोरून नेहल्याची तक्रार भिगवण पोलीस ठाण्यात दिली होती.ऊस वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्याची झालेली चोरी भिगवण पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष अधिकारी विनोद महांगडे यांनी गांभीर्याने घेत सदर चोरीच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील,पोलीस अंमलदार महेश उगले,संतोष मखरे,सचिन पवार आणि प्रमोद गलांडे यांची टीम नियुक्त करून तपासकामी पाठविले. या टीम ने बारामती अग्रो कारखाना तसेच बावडा व इतर मार्गातील जवळपास १०० च्यावर सीसीटीव्ही चे आकलन करून तसेच तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदार याच्या माध्यमातून बावडा येथील चोरट्याच्या मुसक्याआवळल्या. मात्र या चोरट्याने ट्रॅक्टर ला असणारी जी.पी.एस सेवा भवानीनगर परिसरात काढून टाकल्याचे लक्षात आले.त्यामुळे पोलीस पथकाने संशयित चोरट्याला बोलते केले. त्याने ट्रॅक्टर हा नळदुर्ग ता.धाराशिव येथे लपविला असल्याचे कबूल केला,पोलीस अंमलदार महेश उगले यांनी लागलीच सदरचा मुद्देमाल ताब्यात घेत कारवाई पूर्ण केली.सदरची कामगिरी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख,अपर पोलीस अधीक्षक बारामती विभाग गणेश बिरादार,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली भिगवण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे,पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील,पोलीस अंमलदार महेश उगले,संतोष मखरे,सचिन पवार,प्रमोद गलांडे यांनी केली.

# श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत राज्य स्तरावर झेनिथ २०२५ भव्य क्रीडा स्पर्धा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**



श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत राज्य स्तरावरील वार्षिक क्रीडा स्पर्धा झेनिथ २०२५ ह्या स्पर्धेचे दिनांक:२८ फेब्रुवारी ते २ मार्च २०२५ या कालावधीत संस्थेच्या क्रीडांगणावर उत्साहात पार पडले. या महोत्सवात महाराष्ट्रातील नांदेड, छ.संभाजीनगर, अमरावती, भंडारा, शेगाव, नागपूर, जळगाव, चंद्रपूर येथील विविध अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालयांमधून ८०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, क्रिकेट, फुटबॉल, खो-खो, शतरंज (उहशीी) तसेच अथलेटिक्स (२०० मीटर, ४०० मीटर धावणे, लांब उडी, उंच उडी, रिले शर्यत) अशा विविध १८ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य संत बाबा सुखविंदर सिंघजी व संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी संस्थेचे विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. संजय देठे, झेनिथ समन्वयक डॉ.अंकुश सावरकर, सह-समन्वयक डॉ. जीत पाटील, क्रीडा प्रभारी श्री. भास्कर कदम, विद्यार्थी समन्वयक उद्बोधन सोनवणे, डॉ. महेंद्र सुक्रे, डॉ. प्रकाश खुडे, डॉ.प्रवीण कुबाडे तसेच संस्थेतील अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी व झेनिथ टीमचे सदस्य अक्षय मोरताले, सागर अणेराये, अनिकेत धारवाड, श्रुती कोलवते, गौरव नायसे, वैष्णवी पौळ, आकाश फकीरे, वैभवी बरसमवार, यश पोहाणे उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी संत बाबा सुखविंदर सिंघजी यांनी मार्गदर्शन करत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमधून आलेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमधून आलेल्या खेळाडूंना गुरुद्वारा (कौठा) येथे रहाण्याची व जेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, खेळ आपल्याला केवळ शारीरिक तंदुरुस्ती देत नाहीत, तर नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संघभावना देखील विकसित करतात. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला गती मिळते. भविष्यातही अशा स्पर्धांचे आयोजन करत संस्थेचे विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकतील, अशी आशा व्यक्त केली.

अधिष्ठाता प्रा.संजय देठे यांनी झेनिथ स्पर्धा अत्यंत यशस्वी झाली असून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा व फिटनेसची आवड निर्माण करण्यास उपयुक्त ठरेल असे म्हटले व तसेच समन्वयक, स्पर्धक, संयोजक, विद्यार्थी स्वयंसेवक यांनी विविध क्रिडा स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल अभिनंदन केले.झेनिथ २०२५ स्पर्धेचे बक्षीस वितरण शेवटच्या दिवशी करण्यात आले. यामध्ये स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

झेनिथ २०२५ चे समन्वयक डॉ. अंकुश सावरकर आभार व्यक्त केले. संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष व सर्व सदस्य आणि संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे, अधिष्ठाता प्रा.संजय देठे यांचे मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मनपूर्वक आभार मानले.

## श्रीक्षेत्र उमरज येथे छत्रपती शिवराय यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आ.चिखलीकर यांच्या हस्ते आनावरण !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील धाकटे पंढरपूर म्हणुन प्रसिध्द आसणारे श्री क्षेत्र उमरज येथे बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवराय यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आनावरण सोहळा कार्यक्रम कंधार लोहा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या शुभहस्ते नुकताच संपन्न झाला,महाराष्ट्रात प्रसिध्द आसणारे धाकटे पंढरपूर म्हणुन संबोधल्या जाणारे श्री क्षेत्र उमरज येथे दि.२७ फेब्रुवारी रोजी पासुन १०८ कुंडी यज्ञ व कलशारोहण कार्यक्रमा निमित्त भारतातील प्रसिध्द आसणारे भागवताचार्य देवकीनंदजी ठाकुर यांच्या भागवत कथा प्रारंभ झाली याचेचे औचीत्य साधुन बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवराय यांचा आश्वारुढ पुतळा आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या योगदानातुन उभारण्यात आलेल्या आश्वारुढ पुतळ्याचे आनावरण सोहळा आमदार चिखलीकर यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी माजी जि.प.सदस्य बाबुराव पाटिल गिरे हंसराज पाटिल बोरगावकर,स्वप्नील पाटिल लुंगारे,सोपानराव पाटिल लोंढे व्यकटराव मामडे,बाबुराव केंद्रे,भगवानराव मुंडे,पंडीत फाजगे ,प्रल्हाद पाटिल फाजगे यांच्यासह गावातील विनोद पाटिल तोरणे,परसराम तोरणे,नवनाथ तोरणे,विलास सांगवे,शंकर भुत्ते जनार्धन केंद्रे,गिरीष देशपांडे,गोविंद भुत्ते,राजेश भुत्ते,रूषी तोरणे,एकनाथ तोरणे,काशिराम तोरणे,बालाजी तोरणे,शत्रुगण तोरणे,विशाल भुत्ते,शामराव गायकवाड,शिवाजी गुट्टे ,माधव भुत्ते,आदींची उपस्थितीती होती यावेळी गावातील शिवभक्तांनी आमदार चिखलीकर यांचे आभार माणुन स्वागत केले,

## जयभवानीच्या ज्योती तागडची राज्य स्तरीय महिला खो खो स्पर्धेसाठी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**



जयभवानी विद्यालयाची सर्वोत्कृष्ट खेळाडू कु. ज्योती तागड हीची राज्यस्तरीय महिला खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली असून तीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

शेवगाव येथे १३ मार्च ते१६ मार्च दरम्यान होणाऱ्या खो-खो स्पर्धेसाठी ज्योती सहभागी होणार आहे. नुकत्याच झालेल्या क्रीडा महोत्सवात ज्योती तागड हीने खो खो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली होती. क्रीडा शिक्षक देविदास गिरी, विजय अपशिंगेकर, गणपत डोंगरे, आकाश आडे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्योतीने वेगवेगळ्या स्पर्धा गाजवील्या असून आता तीची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाली आहे.ज्योती तागड हीच निवड झाल्याबद्दल माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक अध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव जयसिंग पंडित, आ.विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासनाधिकारी प्रा. गोगुले, मुख्याध्यापक वसंत राठोड , पर्यवेक्षक हरिभाऊ हाकाळे यांच्यासह ज्येष्ठ शिक्षक सुदाम शेजाळ, शिवाजी शेळके, मनोहर बने, रणजीत बडे, मोहन काकडे, दिपक शिंदे, राजेंद्र काळे,चंद्रकांत पवार, सुधाकर देशमुख, श्रीमती वराट, काळे,जायभाये, पवार मॅडम, दादा तळेकर, सुमेर सय्यद, वसंत परदेशी, रमेश देशमुख, विलास मोटे, नितीन पांढरे, श्रिराम शिंदे, सोमनाथ पाटेकर, भागवत पवार, राजेंद्र गर्कळ, अनिकेत, बंडू बारगजे, अनिकेत कांडेकर,अभीषेक पवार, ऋषी फुलझळके, उद्धव कोकाट, संदिपान माळी राजेंद्र खरातयाच्यासह पालकांनी ज्योतीच्या यशाबद्दल अभिनंदन व कौतुक केले.

## मा.मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचा उमरा सर्कल च्या वतीने मारतळा येथे सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कापसी । बालाजी शिंदे**



दि.३ मार्च २०२५ रोज सोमवारी मारतळा येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण साहेब हे.हाळदा व उमरज बोरी कंधार चा दौरा आयोजित करण्यात आला होता.या वेळी मार्ग मारतळा दौरा असल्यामुळे सर्व उमरा सर्कल च्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळेस भास्करराव पाटील शिंदे जोमेगावकर, भास्कर पाटील ढगे, उध्दव पाटील ढेपे, बळी पाटील भरकडे, विनायक हंबर्डे,माधव कदम, भगवान मुंडकर, निरंजन कौडगावकर , माधव ढेपे, विलास ढगे, सुनील भदरगे, सचिन भरकडे तसेच उमरा सर्कल चे भाजपा नेते, पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

## बौध्दगया मंदीर १९४९ कायदा रद्द करण्यात यावा या मागणीसाठी सर्व आंबेडकरी संघटनांची निदर्शने

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

महात्मा गौतम बुध्द यांना ज्ञान प्राप्ती झालेले ठीकाण म्हणजेच बिहार राज्यातील बौध्दगया जगभरातील सर्व बौद्धांचे धार्मिक स्थान असलेल्या बौध्द गया येथील महाबोधी महाविराचा ताबा आम्हाला मिळावा यसाठीराष्ट्रीय स्तरावर मोठे आंदोलन सुरु आहे.परंतु हे सरकार जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहे.गेली अनेक दिवसांपासुन बौध्द गया येथे बौध्द भिक्खु महाबोधी महाविहार मुक्तीसाठी आंदोलन करीत आहेत.आंदोलन करणा-या बौध्द भिक्खुंना पाठींबा दर्शविण्यासाठी व बौध्द महाविहार मुक्तीसाठी रिपब्लिकन सेनेचे माजी मराठवाडा उपाध्यक्ष अनिल दादा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आज लोहा तालुक्यातील सर्व आंबेडकरी संघटना रिपब्लिकन सेना,वंचित बहुजन आघाडी,भिम आर्मी,ऑल इंडीया पँथर,ब्ल्यु टायगर सेना यांच्या वतीने आज लोहा तहसिल कार्यालया समोर तिव्र निदर्शने करण्यात आली.यावेळी आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ नेते बालाजी खिल्लारे,रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिल दादा गायकवाड,ऑल इंडीया ब्ल्यु टायगर चे जिल्हाध्यक्ष संतोष भावे,रिपब्लिकन सेना तालुकाध्यक्ष सखाराम सोनवणे,जिल्हा सचिव रंगनाथ जोंधळे,सामाजीक कार्यकर्ते,भारतीय बौध्द महासभेचे गिरीष भालेराव,प्रहार दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष राहुल हंकारे,वंचित बहुजन आघाडीचे तालुका संघटक श्यामवाघमारे,भिम आर्मि तालुकाध्यक्ष देवानंद जोंधळे,ऑल इंडीया पँथर सेना तालुकाध्यक्ष रितेश भालेराव,समता सैनिक दलाचे सिध्दार्थ ससाणे,सचिनआढाव,डी.टी.आढाव,नवनाथ आढाव,नारायण गायकवाड,आनंदा एडके,आतम गायकवाड,विकास वाघमारे,विकास हंकारेआदींची उपस्थीती होती.



# दुचाकी चोरणारा युवक मुद्देमालासह भोकर पोलिसांच्या ताब्यात; तीन दुचाकी ताब्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

वेगवेगळ्या ठिकाणाहून तीन दुचाकी चोरणाऱ्या सदाशिव उर्फ सदानंद शंकर गोरे वय वर्षे २६ रा.रेणापूर ता.भोकर यास भोकर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून मिळालेल्या १ लाख ४९ हजार किमतीच्या तीन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

दिनांक २६ फेब्रुवारी रोजी भोकर बस स्थानकासमोरील पारस ज्यूस सेंटर समोरून नागापूर येथील मारुती पुंजरवाड यांची मोटरसायकल क्र.एम एच २६ झेड ०७०५ ही चोरीला गेली असल्याची तक्रार भोकर पोलिसात देण्यात आली होती.सदरील गुन्ह्याचा तपास करत असताना भोकर पोलिसांनी रेनापुर तालुका भोकर येथील सदाशिव उर्फ सदानंद गोरे या युवकास संशयावरून ताब्यात घेतले असता चौकशी अंती सदरील युवकांनी चोरी केल्याची कबुली दिली व या शिवाय इतर दोन मोटरसायकल चोरल्याचेही त्यांनी कबुली दिली.तेव्हा त्याच्या कडून होंडा शाईन एम एच २६ सि एच ०८६७ व एम एच २६ एस २९०९ क्रमांकाच्या मोटरसायकली जप्त करण्यात आल्या.आरोपी कडून एकूण १ लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल भोकर पोलिसांनी जप्त केला.

सदरील आरोपींविरुद्ध भोकर पोलिसांत तिन दुचाकी चोरी प्रकरणी गु.र.नं १) ८७/ २०२५, २)९०/ २०२५, ३) ९१/२०२५ कलम ३०३ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.सदरील गुन्हे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे,सुरज गुरव, सहाय्यक पोलीस अधीक्षक भोकर शफकत आमना यांनी उघडकीस आणले असून भोकर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ सोनाजी कानगुले पो.कॉ.प्रमोद जोंधळे यांनी कार्यवाही करून पुढील तपास करीत आहेत.



### शाळा म्हणजे देशाचे समृद्ध नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम

# विश्व पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण पाटील वडजे**

देगलूर व परिसरातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नाविन्यपूर्ण व आनंददायी शिक्षणासाठी नावारूपास येत असलेल्या भक्तापूर रोड येथील विश्व पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अनेक नामवंत मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाला उद्घाटक म्हणून देगलूरचे तहसीलदार भरत सूर्यवंशी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण व पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांची विशेष उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, शिक्षण तज्ञ एच. एस. खंडागळे, डॉ. जनार्दन भूमे, बसवराज पाटील वन्नाळीकर, डॉ. अमोल पाटील सुगावकर, अविनाश कोटगिरे, येळगीचे दादाराव पाटील, बालाजी पाटील थडके, शंकरराव पोलीस पाटील, नागनाथराव टोंपे, माधवराव फुलारी, बसवराज द्याडे, चिल्लवरवार सर, एकनाथ टेकाळे, बालाजी पाटील थोटवाडीकर, डॉ. सुनील जाधव, संग्राम पाटील नागराळकर, हाणेगाव येथील उद्योजक राजकुमार पंदरगे, संजयआप्पा भालके, शिवा संघटनेचे अशोकराव मजगे, शिक्षक संघटनेचे विश्वनाथ पाटील, संतोष शिंदे, ओमप्रकाश बावगे, बसवंत हळदे, विजय आमटे, सरपंच वैभव पाटील, सुरेश लगडे, दिपक रेड्डी, पत्रकार व पालक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी शाळेच्या वतीने सीमेवर देशाची सेवा




करून निवृत्त झालेले जवान उमाकांत सुलफुले व श्रीधर कावटवाड या दोघांचा विशेष सत्कार सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शाळेच्या संचालिका आम्रपाली येसगे यांनी 'शाळा हे समाजाचे लघुरूप असून समाज परिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम आहे. तसेच देशाचे समृद्ध नागरिक घडवण्याचे केंद्र म्हणजे शाळा होय. याच उद्दिष्टांना डोळ्यासमोर ठेवून समृद्ध व अष्टपैलू विद्यार्थी घडवण्याचे कार्य विश्व पब्लिक स्कूलमधून करण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे प्रतिपादन यावेळी केले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते व विद्यार्थ्यांतील कला कौशल्यांचा विकास होतो असे विस्तृतपणे सांगितले. उद्घाटनपर भाषणात तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी शाळेतील विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक करून विद्यार्थी, पालक व शिक्षकांना भरभरून शुभेच्छा दिल्या. शाळेतील बाळगोपाळांनी विविध कलागुणांचे अत्यंत उत्साहात सादरीकरण केले.स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.तर आभार प्रदर्शन विश्व परिवाराचे संस्थापक कैलास येसगे कावळगावकर यांनी केले.


## आंबुलगा परिसरात अवैधरित्या देशी व विदेशी दारुची सर्रास विक्री

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील आंबुलगा परिसरात सकाळी ६ पासून अवैधरित्या देशी व विदेशी दारु सर्रासपणे विक्री करित आहेत,त्यामुळे मद्य शौकीनांचा सुळसुळाट चालू आहे,मद्याच्या नशेत भावी पिढी उद्धस्त होत आहे,त्यात अजून १८ वर्ष वय पूर्ण सुध्दा झालेले नाही,कि मिसूर्डे सुद्धा फुटलेले नाही.असे तरुण दारूच्या व्यसनेच्या आहारी जात आहेत.

कंधार ते मुखेड आंबुलगा ते कळंका रस्त्यांवर दोन्ही बाजुने असलेले काही शेतकरी भाडयाच्या लालसेने आपले शेत पाडुन ठेवुन भाडयाने देत आहेत. त्यांना काही देणे घेणे नाही,आंबुलगा परिसरातील शेल्लाळी, सावरगाव (नि.), टोकवाडी



याठिकाणी कसल्याही प्रकारची शासनाची परवानगी नसताना दारु विक्री करणारे ठांण मांडुन बसलेले आहेत, धाबेवाले खानावळीच्या नावाखाली अनाधिक्रत देशी विदेशी दारु विक्री करीत आहेत. यामुळे अनेक जणांचे संसाराची राखरांगोळी होत असुन संसार धुळीला मिळत आहेत,तसेच तरुण वर्ग व्यसनाधिन होत आहे,आणि घरी व गावात दारुच्या नशेत दारुडे वाद-विवाद करुन भांडण तटे करीत आहेत व शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व्यसनाधीन होत आहेत. तसेच त्यांच्या संसार उध्वस्त होत आहे,स्थानिक पातळीवरील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे याकडे होणारे दुर्लक्ष म्हणा किंवा आर्थिक संबंधांचा परिणाम, सकाळपासूनच परिसरात राजरोसपणे मद्याची विक्री केली जात आहे.सामान्यांना कायद्याचा धाक दाखवणारे स्थानिक पोलिस मात्र देशी दारू दुकानांविरोधात कारवाई करताना 'डगमगताना' दिसत आहेत.याकडे पोलीस प्रशासन व संबंधित यंत्रणां जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहेत,असे परिसरातील जनतेतून बोलल्या जात आहे,वेळीच अवैधरित्या दारु विक्री करणा-यावर व जमीन मालकावर कायदेशीर कारवाई होणार काय ? अशी जनतेत चर्चा होत आहे.

## विज ग्राहकांना वाढीव वीज बिलाचा भुर्दंड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबुब शेख**

चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला अशी एक म्हण आहे. मुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्रात वीज पुरवणाऱ्या महावितरणने ही म्हण खरी केली आहे. माहिती अधिकारात सरकारी वीज कंपनीचा एक असा गैरकारभार उघड झालाय, की महावितरणला तात्काळ कुलूप का लावू नये असा प्रश्न पडतो.
महाराष्ट्रातल्या ग्राहकांची ही आर्थिक लूट आणि मनस्ताप चिड आणणारा आहे. गेल्या एका महिन्यात ३९ हजार बिल तब्बल रुपयांचे वाढीव बिल देण्यात आलं होतं.आदर्श गाव देऊळवाडी गावचे रहिवाशी गुट्टे बालाजी बापूराव ते पेंटर



आहेत. एक खोली त्यात १बल्प आहे त्यांना ३९ हजार रुपये वीज बिल आलं. थकबाकीवर २३०० रुपये व्याज लावलं. अनेक अर्ज-विनंत्यानंतर गुट्टे बालाजी यांना सहा महिन्यांनी मीटर बदलून मिळालं. पण पुन्हा व्याजासकट फॉल्टी बिल आलंच.वीज भरणा केंद्रात केव्हाही जा...वीज बिल दुरुस्तीसाठी आलेल्या ग्राहकांची रांग दिसते. खरी चुकी आहे कोणाची रीडिंग वाले की सरकार गोर गरीब लोक महावितरणला जाम वैतागले आहेत.

### हाळदा येथे संत तुकाराम महाराज बीज निमित्त

## अखंड हरिनाम सप्ताह व संगीत श्रीमद् देवी भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

तालुक्यातील मोजे हाळदा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या बीज प्रित्येर्थ दि.९ मार्च २०२५ ते दि.१६ मार्च २०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून परमपूज्य बालयोगी स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून दुपारी १ ते ५ या वेळेत संगीत श्रीमद् देवी भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा संपन्न होणार आहे. तसेच दररोज रात्री खालील मान्यवर संतांची हरिकीर्तने होणार आहेत.

या हरिनाम सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम खालील प्रमाणे राहणार आहेत.सकाळी ४ ते ६ काकडा भजन





व आरती,७ ते १० श्री संत तुकाराम महाराज अभंग गाथा पारायण,दुपारी १ ते ५ श्रीमद् देवी भागवत कथा ज्ञान यज्ञ, सायंकाळी ६ ते ७:३० हरिपाठ व रात्री ८:३० ते ११ खालील मान्यवर संतांची हरिकीर्तने होणार आहेत.दि.९ मार्च हभप श्रीराम महाराज कुरे शिवनीकर,दि.१० मार्च हभप संतोष महाराज अभंगराव पंढरपूरकर,दि.११ मार्च हभप सच्चिदानंद गुरू यदुबन महंत महाराज सरेगाव,दि.१२ मार्च हभप भागवताचार्य पंजाबराव महाराज चालगणीकर,दि.१३ मार्च हभप नरसिंग महाराज केरुरकर,दि.१४ मार्चहभप कल्याण महाराज वारे मुरुंबेकर दि.१५ मार्च गुरुवर्य हभप माधवराव महाराज बोरगडीकर यांची हरिकीर्तने होणार आहेत. दि.१६ मार्च २०२५ रोज रविवारी सकाळी ९ ते १२ परमपूज्य बालयोगी स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज यांचे काल्याचे किर्तन व दुपारी १२ वाजता गुलाल उधळून श्री संत तुकाराम महाराज बीज उत्सव सोहळा व त्यानंतर भव्य महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.तरी या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा परिसरातील सर्व भाविक भक्तांनी आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन समस्त हाळदा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आष्टी येथील सावित्रीबाई फुले बाल विद्या मंदिरातील चिमुकल्यांचा कलाविष्कार सादर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने सुरू झालेल्या बाल विद्यामंदिर शाळेने आपल्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष सांस्कृतिक कार्यक्रम २० फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित केला होता.या शाळेने नर्सरी ते यु.के.जी.च्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच विविध कलागुणांवर आणि कृतीयुक्त शिक्षणावर भर दिला आहे.
या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार दरेकर नाना यांनी केले, तर दीपप्रज्वलन प्राध्यापक ढोबळे सर आणि नागथई भाऊ यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.या वेळी अनेक मान्यवर उपस्थित होते,ज्यात एन.टी. भाऊ गर्जे साहेब,राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रल्हाद काळे,पत्रकार अण्णासाहेब साबळे,अंबादास खेडकर,झांजे वकील साहेब,राजू वारंगुळे,गणेश पोकळे,शिवाजी गिरी, गिरीधारी नाना लटपटे,माजी सरपंच महादेव लटपटे,प्राथमिक शिक्षक पांडुरंग लटपटे,प्रा.सानप सर,इत्यादींचा समावेश होता.शाळेच्या संचालिका लटपटे मॅडम, तुकाराम लटपटे सर,सहशिक्षिका जरांगे मॅडम आणि म्हस्के मॅडम यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. लहान विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या गाण्यांवर नृत्य सादर करून सर्वांचे मन जिंकले.देशभक्तीपर गाणी, लावणी,मराठी आणि हिंदी गाणी, तसेच छत्रपती शिवाजी महाराज व आई-वडिलांविषयी गाणी यांचा समावेश होता.कार्यक्रमाचे आकर्षक डेकोरेशन नागेश गोल्हार यांनी केले होते,तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुंडलिक लटपटे सरांनी केले.मान्यवरांचे सत्कार तुकाराम लटपटे यांनी केले,आणि आभार प्रदर्शन शाळेतील सहशिक्षिका मॅडम यांनी केले.कार्यक्रमानंतर सर्वांसाठी जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

## संगीता आनंदा अंकुश यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**



राजगुरुनगर ( थिगळ स्थळ ) जिल्हा पुणे येथील आदर्श माता,आदर्श गृहिणी सौ संगिता आनंदा अंकुश वय (५४) यांचे रविवार दि.२ मार्च २०२५ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पाठीमागे पती,तीन विवाहित कन्या जावई ,नातवंडे , तीन बहिणी,मेव्हणे एक भाऊ , वहिनी असा मोठा परिवार आहे.राजगुरुनगर येथील सामाजीक कार्यकर्ते आनंदा केशव अंकुश यांच्या त्या पत्नी व फुलगाव येथील संजय विष्णू खंडे यांच्या त्या भगिनी होत.

## युवा नेते संदीप पाटील कवळे यांच्या शुभहस्ते शिंगणापूर येथे कबड्डी स्पर्धेचे उदघाटन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिंगणापूर । प्रतिनिधी**

युवा नेते संदीप पाटील कवळे यांच्या शुभहस्ते शिंगणापूर येथे कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन समारंभ सोहळा संपन्न झाला.आजच्या युवा पिढीच आपलं शरीर आरोग्यमय राहण्यासाठी विविध कष्ट करून शरीर उपयोगी कबड्डी



स्पर्धेच्या कार्यक्रमाचे आयोजन आज शिंगणापूर येथील नवयुवक तरुण बांधवांनी केले आपल्या भागामध्ये काम करत असताना युवा पिढीला एक आदर्श निर्माण व्हावं असं काम हे युवक करत आहेत. त्यांना माझ्या व्हीपी के उद्योग समूहाच्या वतीने शुभेच्छा देतो असे युवा नेते संदिप पाटील कवळे कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना सांगितले.यावेळी उपस्थित, उमरी मार्केट कमिटी संचालक जेष्ठ नेते बापूराव पाटील करकाळेकर,युवा नेते अमोल पाटील ढगे, माजी संचालक दत्तहारी पाटील हिवराळे, गोपीराज बेलकर, विठ्ठल हिवराळे तसेच खेळाडू प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904